# नशा दारुबंदीची की दारुची ?

'दारुबंदीची नशा' हे 19 ऑगस्टच्या लोकसत्तेतील संपादकीय आधारहीन शेरेबाजीने ठासून भरलेले आहे. बिहार मधील दारुबंदीच्या कायद्यातील काही विशिष्ट तरतूदीपुरती टीका मर्यादित ठेवणे उचित ठरले असते. दारुबंदी विषयी भिन्न मते असू शकतात. गोव्याप्रमाणे सर्वांना मोकळेपणाने दारु उपलब्ध असणे व तशी पिण्याची संस्कृती असणे हा उपाय आपण देशासाठी सुचवू इच्छिता का ? तसे शासकीय धोरण असलेल्या देशांमधे – त्यात युरोप व अमेरिकेतले बहुतेक देश आले – दारु हा आरोग्याची सर्वात जास्त हानी करणा-या प्रमुख तीन कारणांपैकी एक झाला आहे. प्रश्न सुटला नाही. आपल्या मांडणीतील अनेक विधाने असत्य किंवा तर्कविसंगत आहेत, म्हणून आक्षेपार्ह आहेत.

1. बिहारमधे विषारी दारु पिऊन पूर्वी 30 व आता 12 जण मेले ही दुःखद घटना आहे. पण त्याचे खापर दारुबंदीवर फोडणे हा कुतर्क आहे. विषारी दारुमुळे भारतात गेल्या दहा वर्षात झालेले बहुतेक मृत्यू हे दारु खुली असलेल्या राज्यात झाले आहेत. महाराष्ट्रात मालवणी येथे दारुचे विषकांड झाले, ओरिसा व बंगालमधे असे मृत्यूंचे थैमान झाले. या कोणत्याच राज्यात दारुबंदी नाही.

   दारु खुली असूनही शासकीय करांमुळे ती महाग मिळते. म्हणून गरीब वर्गातील पिणारे अवैध दारुकडे वळतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार भारतात वैध दारुपेक्षा दुप्पट अवैध दारु वापरली जाते – जरी बहुतेक राज्यात दारुबंदी नाही. शिवाय किक् येण्यासाठी दारुमधे विषारी पदार्थ मिसळवले जातात. दोन्ही कारणांचा दारुबंदीशी संबंध नाही. मृत्यू दारुमुळे झाले, दारुबंदीमुळे नाही. बिहारमधे विषारी दारुमुळे मृत्यू घडल्यावर मागणी प्रभावी दारु नियंत्रणाची हवी. दारुला मोकाट सोडण्याची नाही.

2. बिहारमधे विषारी दारुने झालेले 30 + 12 मृत्यु क्लेषदायक असले तरी 'शुध्द' दारुमुळे बिहारमधे दरवर्षी किती मृत्यू होत होते ? याची नेमकी आकडेवारी नसल्यामुळे एका अप्रत्यक्ष पण ढोबळ पध्दतीचा आधार घेऊ. बिहारची लोकसंख्या ही जागतिक लोकसंख्येच्या जवळपास एक टक्का आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अल्कोहोल वरील अहवालानुसार (2015) जगात दारुमुळे दरवर्षी 33 लक्ष मृत्यू होतात. पाश्चिमात्तय देशांसारखे खुले दारु धोरण बिहारला लागू केल्यास, जागतिक मृत्यूंच्या एक टक्का म्हणजे दरवर्षी बिहारमधे 33 हजार मृत्यू, दारुमुळे होऊ शकतात. कोणती समस्या मोठी ? दारु की दारुबंदी ?

3. "गुजरातेत दारुबंदी आहे. परंतु त्या राज्यात आज जितके मद्य उपलब्ध आहे तितके अन्यत्र नसेल." या तुमच्या वक्तव्यासाठी ऐकीव गोष्टी पलीकडे पुरावा काय ? शेजारच्या महाराष्ट्र किंवा राजस्थानपेक्षा गुजरातमधे दारु जास्त की कमी याचा कोणाकडेच नेमका पुरावा किंवा आकडे नाहीत. गडचिरोलीमधे दारुबंदी आहे. जिल्हाव्यापी सॅंपल सर्वेच्या

आधारावर असा निश्कर्ष निघतो की दारुबंदीमुळे (जरी जिल्हा पूर्णपणे दारुमुक्त झाला नाही तरी) दारुच्या प्रमाणात भरीव घट झाली आहे. प्याला पूर्ण भरलेला नाही पण पूर्ण रिकामाही नाही. हे वास्तव कसे बघायचे हे आपल्या दृष्टीवर अवलंबून आहे.

4. अमेरिकेत 1920 च्या दरम्यान केलेली दारुबंदी अयशस्वी झाली हे तुमचे म्हणणे आंशिकच खरे आहे. त्या काळातही अमेरिकेत दारुमुळे होणारे मृत्यू कमी झाले होते. आणि शिवाय भारत अमेरिका नाही. अमेरिकेत जवळपास 80 टक्के लोक मद्यपान करतात. अशा दारु संस्कृतीत दारुबंदी लागू करणे कठीणच होते. पण जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतातील 79 टक्के लोक आयुष्यात कधीच मद्यपान करीत नाहीत. भारतातील सांस्कृतिक व सामाजिक स्थिती मोठ्या प्रमाणात दारुविरोधी आहे. त्यामुळे अमेरिका व युरोपचे उदाहरण गैरलागू आहे. त्या ऐवजी आपण जवळची उदाहरणे घेऊ. अमेरिका व युरोपमधे प्रतिव्यक्ती मद्यपानाचे वार्षिक प्रमाण (अब्सोल्यूट अल्कोहलच्या परिभाषेत) 10 ते 15 लिटर आहे. (म्हणजे 1000 ते 1500 पेग) भारतात ते 4 लिटर आहे. पण जगातील 26 देशात ते 1 लिटरपेक्षा कमी आहे. बंगलादेशमधे ते 200 मिलि आहे, भूतान व म्यानमारमधे 600 मिलि आहे. सामाजिक प्रघात व संस्कृती सोबत शासकीय धोरण दारुविरोधी असल्यास देशातील मद्यपान शून्य करता येत नसले तरी अत्यंत कमी करता येते याचा पुरावा हे 26 देश आहेत.
5. नितीशकुमारांचे गुणगान करणे हा माझा हेतू नाही. पण “ठोस दाखवण्यासारखे नसले की सत्ताधारी बनावट कारणे शोधू लागतात. दारुबंदी हे असे सार्वत्रिक बनावट कारण आहे.” हे तुमचे विधान वास्तवासमोर कोलमडते. नितीशकुमारांना बिहारमधील जनतेने भरघोस मतांनी निवडून सत्ता दिली, किंवा ‘इंडिया टुडे’ चॅनलवर कालच प्रकाशित आकडेवारीनुसार 87 टक्के लोकांना नितीशकुमार देशातील सर्वोत्तम मुख्यमंत्री वाटतात. त्यामुळे निवडून आल्यावर सवंग लोकप्रियतेसाठी त्यांनी किंवा जयललितांनी दारुबंदी घोषित करण्याची गरज दिसत नाही. उलट लोकांना काय हवे याबाबत त्यांना अधिक व प्रत्यक्ष भान असल्याने त्यांनी जनतेच्या मागणीनुसार दारुबंदी जाहीर केली.
6. ‘दारुबंदीची मागणी करणा-यांना नैतिक अहंकार, दारुबंदीची नशा आहे’ इत्यादि शेरेबाजी आपण केली आहे. आयुष्यात कधीही दारु पिणा-यांपैकी 15 ते 25 टक्केंना त्याचे व्यसन होते व दुष्परिणाम भोगावे लागतात. त्यांच्या घरातील स्त्रिया व मुलांना भोगावे लागतात. त्यांचे शेजारी-पाजारी, कामावरील सहकारी इतकेच नव्हे तर निर्भयाला व कोपर्डीमधील स्त्रीला भोगावे लागतात. दारु पिऊन जेव्हा सलमानखान कार चालवतात तेव्हा फुटपाथवरील माणसांचे जीव धोक्यात पडतात. दारुचे समर्थन करणा-यांना हे भयंकर दुष्परिणाम कसल्या नशेमुळे दिसत नाहीत ?
7. “दारुबंदी अमलात आणण्याचा खर्च हा दारुच्या व्यवहारातून होणा-या उत्पन्नापेक्षा अधिक असतो” हे तुमचे विधान धादांत असत्य आहे. महाराष्ट्र शासनाला दारुपासून तेरा हजार

कोटी रुपये अबकारीकर व आठ हजार कोटी रुपये व्हॅटच्या रुपात मिळतात. या पैकी एक टक्का देखील दारुबंदीच्या अंमलबजावणीवर खर्च केला जात नाही. अमेरिकेत शिफ्रीन या अर्थशास्त्रज्ञाने व भारतात राष्ट्रीय मानसरोग व मेंदू विज्ञान संस्था (NIMHANS) ने केलेल्या अभ्यासांनुसार दारुमुळे शासनाला मिळणा-या एकूण उत्पन्नापेक्षा दारुमुळे होणारे समाजाचे नुकसान (रोग, मृत्यू, अपघात, गुन्हे, गैरहजिरी) हे आर्थिक दृष्ट्या अधिक असते.

दारुचे दुष्परिणाम कमी कसे करता येईल याचे उत्तर शोधणे ही देशातील कोट्यावधी लोकांची गरज आहे व जागतिक आरोग्याची प्राथमिकता आहे. दारुबंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी केवळ कायदा किंवा बडगा पुरेसा नाही. त्यासाठी व्यापक लोकशिक्षण, सामाजिक प्रघात बदलणे, व्यसनमुक्ती व अन्य निरोगी मनोरंजन हे सर्व आवश्यक आहेत. पण हे सर्व उपाय प्रभावी होण्यासाठी शासनाने दारुला मान्यता देणे बंद करावे ही पूर्वअट आहे. निव्वळ दारुबंदी पुरेसी नाही. दारुबंदी सोबत अजून बरेच काही उपाय हवेत. दारुबंदीकडून दारुमुक्तीकडे प्रयत्न व प्रवास हवा.

डॉ. अभय बंग
गडचिरोली

30.8.16

लोकसत्तेतील 'दारुबंदीची नशा' या संपादकीयावर माझी टीकात्मक प्रतिक्रिया 'नशा दारुबंदीची कशी ?' ठळकपणे प्रकाशित करण्यात लोकसत्तेचा मोकळेपणा प्रकट झाला. त्यासाठी मनापासून अभिनंदन. श्री. अजय ब्रह्मनाळकरांनी 26 ऑगस्टच्या लोकसत्तेत माझ्या प्रतिपादनावर काही आक्षेप मांडले आहेत. त्यात त्यांनी गणिताच्या प्राथमिक चुका केल्या आहेत. जागतिक लोकसंख्येपैकी बिहारची लोकसंख्या ही "जवळपास एक टक्का" आहे असे मी म्हटले होते. त्यावर त्यांचे "7.4 अब्ज पैकी दहा कोटी म्हणजे 0.13 टक्के" किंवा "एकूण 33लक्ष मृत्यूच्या 0.1 टक्के म्हणजे 33,000 मृत्यू". हे दोन्ही गणित सपशेल चूक आहेत. तसेच दारुच्या एका पेग विषयी ब्रह्मनाळकरांची कल्पना चूक आहे. दारुच्या एका पेगचा आकार वेगवेगळा असू शकतो. म्हणून जगभर दारु पिण्याचे एक स्टन्डर्ड युनिट साधारणतः 10 ग्रॅम एब्सोल्यूट अल्कोहोल असे आहे. (रेंज 8-12 ग्रॅम) (ए बी सी ऑफ अल्कोहोल. ब्रिटीश मेडिकल जर्नल 1990). त्यामुळे 1 लिटर एब्सोल्यूट अल्कोहोल म्हणजे जवळपास 100 युनिट होतील. भारतातील दारुचे सरासरी वार्षिक सेवन 4 लिटर अब्सोल्यूट अल्कोहोल एवढे आहे ही जागतिक आरोग्य संघटनेची आकडेवारी आहे. कुणाचे मत नाही.

लोकहिताच्या दृष्टीने या विषयावरील चर्चा ही केवळ दारुबंदी हवी की नको एवढ्यापुरती मर्यादित राहू नये. चर्चेनंतरही याबाबतीत प्रामाणिक मतभिन्नता राहू शकते. वस्तुतः दारुबंदीचे समर्थन करणा-यांचेही ध्येय दारुबंदी नाही. ते एक साधन आहे. अनेक साधनांपैकी एक. कोणत्याही इतर साधनांप्रमाणे ते ही साधन परिपूर्ण नाही. त्यामुळे खरी चर्चा केंद्रित व्हायला हवी – समाजहितासाठी दारुचे समाजातील प्रमाण कमी करावे की नको ? आणि कमी करायचे असल्यास कसे ? या दोन मुद्यांवर.

'दारु पिणे चांगले की वाईट ?' अशा केवळ नैतिक भूमिकेतून आज दारुबाबत चर्चा नाही. दारु आरोग्याला घातक आहे हे विज्ञान आहे. जगातील आरोग्याच्या प्रमुख तीन धोक्यात दारुचा समावेश होतो. (इतर दोन धोके - ब्लड प्रेशर व तंबाखू. ग्लोबल बर्डन ऑफ डिसीझ स्टडी 2013) म्हणून वर्ल्ड हेल्थ असेंब्लीने 2009 मधे प्रस्ताव पारित केला आहे की सर्व देशांच्या सरकारांनी दारुने होणारा घात कमी करावा. दारु हा आता निव्वळ गंमत किंवा सुखाची थोडीशी चव असा विषय उरलेला नाही.

दारुचे दुष्परिणाम कमी करण्याच्या विविध उपायांची मोठी यादी संभव आहे. सार हे की दारुची मागणी व पुरवठा दोन्हीही कमी व्हायला हवेत. मागणी कमी होण्यासाठी व्यापक जागृती होणे तसेच समाजातील पिण्याचा प्रघात, फॅशन, संस्कृती बदलविणे आवश्यक आहे. लेखक, संपादक, कलावंत हे त्यांच्या माध्यमांतून समाजमन घडवतात. म्हणून त्यांची मते महत्वाची.

पण ब्रिटिश मेडिकल जर्नलच्या प्रकाशनात अलेक्स पॅटन म्हणतो त्यानुसार “केवळ लोकशिक्षण हे दारुचे दुष्परिणाम कमी करण्यात निष्फळ ठरते.” म्हणून सोबत दारुचा पुरवठा उत्तरोत्तर कमी करत नेणे आवश्यक आहे. यासाठी शासकीय दारुबंदी किंवा दारु नियंत्रण नीती महत्वाची ठरते. केरळ सरकारने दीड वर्षांपूर्वी दारुबंदी लागू करतांना खाजगी दुकाने बंद केलीत व शासकीय नियंत्रित पुरवठा दरवर्षी दहा टक्क्याने कमी करुन दहा वर्षात शून्य करण्याची नीती घोषित केली. या उलट बिहार सरकारने एकदम सर्वंकष दारु बंद केली. कोणती पध्दत किती प्रमाणात प्रभावी ठरते ते अनुभवाने कळेल.

यश-अपयश कसे मोजणार ? दारुबंदीबाबत एक अवास्तव अपेक्षा व फूटपट्टी वापरली जाते. ‘दारुबंदी असूनही अवैध दारु मिळते म्हणजे दारुबंदी अयशस्वी’ असा न्याय ते लावतात व दारुबंदी उठवा अशी मागणी करतात. या न्यायाने चोरी, बलात्कार, भ्रष्टाचार हे इंडीयन पीनल कोडनुसार गुन्हे असूनही आजही समाजात घडतात म्हणजे संपूर्ण कायदा व्यवस्था अयशस्वी मानायची ? उठवायची ? प्रत्येक समाजसुधारणा क्रमशः व पाउला-पाउलाने यशाकडे वाटचाल करते. 1970 साली भारताचा अर्भक मृत्युदर 140 होता. हळुहळु कमी होत आता 40 वर आला आहे. शंभरने कमी झाला हे यश ? की अजूनही चाळीस होतात हे अपयश ? यश किंवा अपयश हे काळे-पांढरे वर्गीकरण बालिश आहे. परिणाम हा क्रमशः व टक्क्यांमधे मोजायला हवा. गरीबी, निरक्षरता प्रमाणेच दारु किती टक्क्यांनी कमी झाली ? ती प्रगती.

समाजातून दारुचे दुष्परिणाम व वापर 90 टक्क्यांनी कमी करणे हे ध्येय मानून, त्यासाठी 1. जनजागृती 2. कायद्याच्या मार्गाने (दारुबंदी व अन्य) दारुची उपलब्धी व वापर कमी करणे 3. लोकसहभाग व कृती 4. व्यसनमुक्ती. 5. मनोरंजन व आनंदाचे अन्य मार्ग उपलब्ध करणे असा पंचरंगी व्यापक कार्यक्रम हवा.

दारुमुक्ती हे ध्येय आहे व त्यासाठी दारुबंदी हे एक साधन आहे. साधन अधिकाधिक सुधरविणे, विकसीत करत नेणे हे शासनाचे व समाजाचे काम आहे.

डॉ. अभय बंग